महाराष्ट्र पोलीस

# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक:- ०१/०८/२०१८

**सेंट्रल जेलमधुन बलात्काराचे गुन्हयात शिक्षा भोगुन आलेल्या आरोपीची घरफोडया करणारी टोळी जेरबंद स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई - इलेक्ट्रॉनिक्स साहित्यासह ८३ मोबाईल फोन हस्तगत**

---

नाशिक ग्रामीण जिल्हयातील पेठ व दिंडोरी तालुक्यात गेल्या काही दिवसांपासुन बंद घरे व दुकानांवर पाळत ठेवुन घरफोडयांचे प्रमाण वाढले होते, त्यामुळे सामान्य नागरीक, नोकरदार तसेच व्यापारी वर्गामध्ये घबराहटीचे वातावरण निर्माण झाले होते. वाढत्या घरफोडीचे गुन्हयांना आळा बसावा यासाठी नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो. व अपर पोलीस अधीक्षक श्री. विशाल गायकवाड सो.** यांनी जिल्हयातील नाउघड घरफोडीचे गुन्हयांचा सविस्तर आढावा घेवुन गुन्हे उघडकीस आणणेसाठी सतर्क रात्रगस्त करणेबाबत सुचना दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी घरफोडीचे रेकॉर्डवरील गुन्हेगारांची गुन्हा करण्याची पध्दत व चोरुन नेलेले मुद्देमाल कोठे विक्री केला जातो याबाबत गोपनीयरित्या माहिती घेवुन स्थागुशाचे पथकास गुन्हे उघडकीस आणणेसाठी मार्गदर्शन करून सुचना दिल्या.

त्याप्रमाणे दिनांक ३१ जुलै २०१८ रोजी मध्यरात्रीचे सुमारास स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील अधिकारी व कर्मचारी पेठ व दिंडोरी तालुक्यात गस्त घालत होते, दरम्यान स्थागुशाचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांना खब-यांमार्फत मिळालेल्या गुप्त बातमीनुसार दिंडोरी, पेठ व नाशिक शहर परिसरात घरफोडया करणारे काही गुन्हेगार दिंडोरी तालुक्यात वास्तव्यास असलेबाबत खात्रीशीर समजले. त्यानुसार स्थागुशाचे पथकाने दिंडोरी तालुक्यातील नाळेगाव शिवारात रात्रभर सापळा रचुन घरफोडया करणारे सराईत गुन्हेगार नामे **१) हरिदास बाळु निसाळ,** वय २६, **२) कार्तिक उर्फ पप्पु नाना भोये,** वय २०, **३) गणेश बाळु निसाळ,** वय १९, **४) राजु सुदाम निसाळ,** वय २२, **सर्व रा. नाळेगाव ता.दिंडोरी** यांना शिताफिने ताब्यात घेतले. सदर आरोपीतांना विश्वासात घेवुन तपासाचे कलाकौशल्य वापरुन चौकशी केली असता त्यांनी गेल्या काही दिवसांपुर्वी **दिंडोरी शहरातील एक मोबाईल शॉपी, तसेच मेडीकल व कापड दुकान फोडुन घरफोडी** चोरी केल्याची कबुली दिली आहे. तसेच वरील आरोपीतांकडे अधिक विचारपुस करता त्यांनी त्यांचा साथीदार नामे **५) श्रावण रामदास वाघमारे,** वय २५, रा. नाळेगाव, ता.दिंडोरी याचेसह **पेठ व गिरणारे परिसरातील मोबाईलची** दुकाने फोडली असल्याची कबुली दिली असुन सदर आरोपीतांनी मिळुन **नाशिक शहरातील पेठ फाटा परिसरातुन ०१ लाल रंगाची बजाज पल्सर** मोटर सायकलही चोरी केल्याचे कबुल केले आहे.

ताब्यात घेतलेले वरील आरोपीतांनी पेठ, दिंडोरी, गिरणारे परिसरतील बंद दुकाने फोडुन घरफोडया केल्या असुन नाशिक शहर परिसरातुन मोटर सायकल चोरी केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर आरोपीतांचे घरांची घडती घेतली असता त्यांचे कब्जात **विविध कंपन्यांचे ८३ मोबाईल फोन, मोबाईल ॲक्सेसरीज, रेडीमेड कपडे व साडया, होम थिएटर-स्पीकर्स, सी.सी.टी.व्ही. कॅमेराचे डिव्हीआर मशिन**, तसेच **चोरी करुन आणलेली ०१ बजाज पल्सर मोटर सायकल,** गुन्हयात वापरलेली **बजाज डिस्कव्हर मोटर सायकल** व गुन्हा करणेसाठी वापरलेले स्क्रु ड्रायव्हर, पक्कड, लोखंडी कटवणी असा **<u>एकुण १ लाख ७१ हजार ६९० रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत</u>** करण्यात आलेला आहे. सदर आरोपीतांनी कबुली दिलेवरुन **पेठ, दिंडोरी व नाशिक तालुका पोलीस ठाणेस** दाखल असलेले **घरफोडीचे एकुण ०५ गुन्हे तसेच पंचवटी पोलीस ठाणेस दाखल असलेला ०१ मोटर सायकल** चोरीचा गुन्हा असे **<u>एकुण ०६ गुन्हे उघडकीस</u>** आलेले आहे. सदर गुन्हयांतील ताब्यात घेतलेले आरोपीतांविरुध्द यापुर्वीही घरफोडी व चोरीचे गुन्हे दाखल असुन सर्व सराईत गुन्हेगार आहे, वरील गुन्हयांचे समांतर तपासात त्यांचेकडुन घरफोडी व चोरीचे अजुन काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

सदर घरफोडया करणारे टोळीचा **म्होरक्या हरिदास बाळु निसाळ** हा सराईत गुन्हेगार असुन त्याचेविरुध्द नाळेगाव आदिवासी आश्रमशाळा बलात्कार प्रकरणी दिंडोरी पोलीस ठाणेस बलात्काराचा गुन्हा दाखल होता, सदर गुन्हयात आरोपी हरिदास निसाळ यास मा.न्यायालयाने दोषी ठरवुन तो मध्यवर्ती कारागृह नाशिक येथुन ०७ वर्षे शिक्षा भोगुन बाहेर आलेला आहे. घरफोडया करण्यासाठी त्याने नुकतीच त्याची नवीन गॅंग तयार केली होती. वरील ताब्यात घेतलेले आरोपी व जप्त मुद्देमाल गुन्हयांचे पुढील तपासकामी पेठ पोलीस ठाणेस हजर करण्यात आले आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक **श्री. संजय दराडे सा०** व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सा०** यांचे मार्गदर्शनाखाली **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे,** पोलीस उपनिरीक्षक **श्री.मच्छिंद्र रणमाळे**, सपोउनि रामभाउ मुंढे, रविंद्र शिलावट, पोहवा प्रकाश तुपलोंढे, हनुमंत महाले, दिपक आहिरे, पुंडलीक राउत, दत्तात्रय साबळे, गणेश वराडे, पोना वसंत खांडवी, अमोल घुगे, जालिंदर खराटे, मपोना योगिनी नाईक अशा पथकाने वरील आरोपीतांना ताब्यात घेतले असुन घरफोडीचे ०५, व ०१ मोटर सायकल चोरी  असे एकुण ०६ गुन्हे उघडकीस आणलेले आहे.